साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
''लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ''
■ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७)
■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com
Volume-5/Issue: 28/ Date: Friday 28/08/2026 Thursday03/09/2026
Pages-4 Prize-5 Rs
RNI.NO.MAHMAR/2022/85385

लोकहिरा न्यूज वृत्त सेवा

## तारदाळ ग्रामसभेत विविध विकासकामां बाबत महत्त्वपूर्ण ठराव



तारदाळ ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच पल्लवी पोवार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. ग्रामपंचायत अधिकारी अनुपस्थित असल्याने ग्रामसभेचे सचिव म्हणून भाऊसो चौगले यांनी कामकाज पाहिले. यावेळी गावातील पाणीपुरवठा, वाहतूक, प्रदूषण व विकासकामांबाबत विविध महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.जलजीवन मिशनअंतर्गत प्रलंबित असलेले जलकुंभाचे काम तातडीने पूर्ण करून नागरिकांची पाणी समस्या दूर करण्याचा ठराव करण्यात आला. तसेच ठाकरे नगर मुख्य रस्ता व समर्थ नगर गल्ली क्रमांक १ येथे अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. अपघातांचा धोका लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.
सायझिंग उद्योगांमुळे होणारे प्रदूषण, दुर्गंधी व नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत संबंधित उद्योगांना नोटिसा बजावण्याचा ठरावही मंजूर करण्यात आला. घरकुल आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांची नावे पाठविण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. यावेळी प्रवीण पाटील, चंद्रकांत तांबवे, मृत्युंजय पाटील, सूर्यकांत जाधव, मालुबाई चौगुले, अकबर करडी, रणजीत पोवार, सचिन पोवार यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.




# पुणे:- पवित्र प्रणालीतून शिक्षक भरतीला वेग; १३ हजार ११९ उमेदवारांची निवड!

साप्ताहिक लोकहिरा न्यूज प्रतिनिधी:- निवास नवघरे

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेला आता मोठी गती मिळाली असून, पवित्र संकेतस्थळाद्वारे मुलाखतीविना निवड प्रकारात तब्बल १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, जिल्हा परिषद शाळांसाठी सर्वाधिक ८ हजार ४८१ उमेदवारांची निवड झाली आहे. याशिवाय नगरपालिका - नगरपरिषदांसाठी २२६, महापालिकांसाठी १३०६, आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळांसाठी १६०१, शासकीय विद्यानिकेतनसाठी ५४ आणि खासगी अनुदानित संस्थांसाठी १४५१ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी ७५४१, सहावी ते आठवीसाठी ४२०७, नववी ते दहावी १११९ आणि अकरावी-बारावीच्या २५२ उमेदवारांचा समावेश आहे.
आता कागदपत्र पडताळणी करून उमेदवारांना लवकरच नियुक्ती देण्यासाठी वेळापत्रक जाहीर होणार आहे. नव्या शिक्षकांच्या नियुक्तीमुळे राज्यातील शाळांमधील अध्यापन प्रक्रियेला नवी ऊर्जा मिळून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.निवडीबाबत तक्रारी असल्यास edupavitra2025grcc@gmail.com या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.



संग्रहीत

# कराड-इचलकरंजी-निपाणी बेळगाव रेल्वेचा फेरविचार करा ; ९ वर्षे जुना निर्णय बदलण्याची वेळ आली!

इचलकरंजी:- लोकहिरा न्यूज प्रतिनिधी:-नितीन दबडे




***केंद्र सरकारने या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाबाबत ठोस व वेळबद्ध निर्णय घ्यावा, अशी मागणी इचलकरंजी रेल्वे कृती समितीने केली आहे.***

इचलकरंजी : कराड-इचलकरंजी-निपाणी-बेळगाव रेल्वे मार्गाचा २०१७ मध्ये 'Shelve' करण्यात आलेला निर्णय आता नव्याने तपासण्याची वेळ आली असून, केंद्र सरकारने या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाबाबत ठोस व वेळबद्ध निर्णय घ्यावा, अशी मागणी इचलकरंजी रेल्वे कृती समितीने केली आहे.
मध्य रेल्वेच्या १२ जून २०२६ रोजीच्या अधिकृत उत्तरानुसार, या रेल्वे मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) २०१६ मध्ये रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला होता. मात्र २०१७ मध्ये रेल्वे बोर्डाने हा प्रस्ताव 'Shelve' केला. त्यानंतर या मार्गासाठी कोणतेही पुढील सर्वेक्षण झालेले नसून प्रकल्प अद्याप मंजूर झालेला नसल्याचेही या उत्तरात नमूद करण्यात आले आहे.
मात्र, २०१६-१७ मधील परिस्थितीच्या आधारे २०२६ मधील औद्योगिक व वाहतूक गरजांचे मूल्यमापन करणे कितपत योग्य आहे?, असा सवाल रेल्वे कृती समितीने उपस्थित केला आहे.
इचलकरंजी हे देशातील प्रमुख वस्त्रोद्योग केंद्र आहे. त्याचबरोबर कागल औद्योगिक क्षेत्र, निपाणीचा तंबाखू व्यापार तसेच कराडपासून बेळगावपर्यंतच्या वाढत्या औद्योगिक आणि व्यापारी हालचालींच्या पार्श्वभूमीवर या रेल्वे मार्गाची वाहतूक क्षमता आणि आर्थिक व्यवहार्यता नव्याने तपासण्याची गरज असल्याचे समितीने म्हटले आहे.
यासाठी Fresh Traffic Survey, Updated DPR तसेच नव्याने Techno-Economic Appraisal करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पाचा FIRR आणि EIRR पुन्हा तपासावा आणि केंद्र सरकारच्या PM GatiShakti व Multimodal Connectivity या धोरणांच्या अनुषंगाने रेल्वे मार्गाचे पुनर्मूल्यांकन करावे, अशी मागणीही समितीने केली आहे.
रेल्वे बोर्डाने या प्रस्तावावर कोणताही निर्णय अनिश्चित काळासाठी प्रलंबित न ठेवता वेळबद्ध पद्धतीने अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.
"२०१६ मध्ये DPR सादर झाला, २०१७ मध्ये प्रस्ताव Shelve झाला आणि २०२६ पर्यंत पुढील सर्वेक्षणही झालेले नाही. त्यामुळे जवळपास दशकभर जुन्या परिस्थितीवर या प्रकल्पाचे भविष्य ठरवू नये. आजच्या औद्योगिक, व्यापारी आणि वाहतूक वास्तवाच्या आधारे नव्याने सर्वेक्षण करून कारणासहित अंतिम निर्णय द्यावा," अशी ठाम भूमिका इचलकरंजी रेल्वे कृती समितीने घेतली आहे.
इचलकरंजीचा रेल्वे हक्क हा केवळ आश्वासनांचा विषय न राहता अद्ययावत सर्वेक्षण, आर्थिक व्यवहार्यता आणि ठोस निर्णयाच्या दिशेने पुढे जावा, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे.

# जागृती'ची कु.अन्वी घुरेच्या चित्राला राज्यस्तरीय स्पर्धेत यश




गडहिंग्लज लोकहिरा न्यूज प्रतिनिधी (संपत सावंत)

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुणे शहर शाखेच्या वतीने शहीद डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त "विद्ये विना मती गेली" या विषयावर नुकत्याच झालेल्या पंधरा वर्षाखालील राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज संचलित जागृती हायस्कूलची कु. अन्वी घुरे हिच्या चित्राला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संचालक इंजि. किशोर हंजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सहसचिव गजेंद्र बंदी, मुख्याध्यापक उमेश सावंत, उपमुख्याध्यापक अनिल मसाळे, पर्यवेक्षक महंतेश दड्डी उपस्थित होते. कलाशिक्षक दत्ता लोहार यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तिच्या यशाबद्दल सर्वतक कौतुक होत आहे.

सामाहिक
# लोकहिरा न्यूज
"लोक स्वतंत्र हेच लोकहिताचे मूळ"
■ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६६६६७७७)
■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com
RNI NO. MAHMAR/2022/85385
Volume-5/Issue: 28/ Date: Friday 28/08/2026 To Thursday03/09/2026 Pages-No 2

लोकहिरा न्यूज
दररोज ताज्या बातम्या पाहण्यासाठी आमच्या
www.lokhiranews.com
अवश्य भेट द्या...!
बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
7276756577

लोकहिरा न्यूज
लाईक करा, शेअर करा, सबस्काईब करा आणि ताज्या बातम्यांसाठी बेल आयकॉनला क्लिक करा..
बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
7276756577

## संपादकीय



**तुकाराम मुंढे**
अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य

# मुंढे नावाचा 'नियमांचा बुलडोझर' की प्रशासनातील आरसा?

प्रशासकीय यंत्रणेत काही अधिकारी असे असतात की, त्यांची बदली झाली की चर्चेला उधाण येते; तर काही अधिकारी असेही असतात की, त्यांची बदली होऊ नये म्हणूनच नव्हे, तर बदली झाली की पुढे काय होणार? याची धास्ती निर्माण होते.

**तुकाराम मुंढे हे महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळातील असेच एक चर्चेत राहिलेले नांव.**

सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात कार्यरत असलेले मुंढे यांनी कारवाईचा धडाका लावल्याची चर्चा आहे. धाडी, उत्पादनांवर निर्बंध, आस्थापना सील करणे, नियमभंगाच्या प्रकरणांत कायदेशीर कारवाई—या सगळ्यामुळे मोठ्या ब्रँडपासून छोट्या व्यावसायिकांपर्यंत प्रशासनाच्या कडक भूमिकेची जाणीव होत आहे. प्रश्न एवढाच आहे की, नियमांची कठोर अंमलबजावणी ही प्रशासनाची ताकद आहे की परिस्थितीचा विचार न करता केलेली कठोरता हीच प्रशासनाची कमजोरी ठरते?

> मुंढे यांच्या कारकिर्दीचा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—ते ज्या विभागात जातात, तिथे 'रूटीन' पद्धतीने काम करण्याऐवजी स्वतःची ठसठशीत छाप सोडतात. त्यांच्या कामांची पद्धत, निर्णय घेण्याची शैली आणि नियमांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामुळे ते सातत्याने चर्चेत राहिले आहेत.

त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने हीच त्यांची ताकद आहे. 'नियम म्हणजे नियम; त्याला कोणासाठीही अपवाद नाही' हा दृष्टिकोन प्रशासनाला शिस्त लावणारा आहे. राजकीय दबाव, हितसंबंध किंवा व्यवस्थेतील सवयी यांना न जुमानता कायद्याची अंमलबजावणी करण्याची वृत्ती ही निश्चितच स्वागतार्ह आहे.

**मात्र दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे.**

**कायदा कठोर असतो; पण प्रशासन माणसांसाठी असते.**

एखाद्या नियमाचा शब्दशः अर्थ लावून निर्णय घेणे आणि त्या निर्णयांचा समाजावर, उद्योगावर, कर्मचाऱ्यांवर किंवा सामान्य नागरिकांवर होणारा परिणाम लक्षात घेणे—या दोन्ही गोष्टींचा समतोल प्रशासनात आवश्यक असतो. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; परंतु प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती, हेतू आणि परिणाम यांचाही विचार झाला पाहिजे.

**कारवाईचा अधिकार हा प्रशासनाला दिलेला परवाना नसून जबाबदारी आहे.**

मुंढे यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांबाबतही अनेक वर्ष चर्चा होत आली आहे. सरकार कोणतेही असो, सत्ताधारी कोणतही असो, एखादा अधिकारी वारंवार चर्चेच्या केंद्रस्थानी येत असेल, तर त्याकडे केवळ व्यक्तींच्या लोकप्रियतेच्या किंवा 'कडक अधिकारी' या प्रतिमेच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. त्यांच्या कार्यपद्धतीचा, निर्णयांचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रशासकीय परिणामांचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची वेळ आली आहे.

**कारण प्रशासन हे केवळ फाईलवरचे नियम नाहीत.**

**प्रशासन म्हणजे नियम + विवेक + संवेदनशीलता + उत्तरदायित्व.**

नियमभंग करणाऱ्यांना मोकळे रान देणे चुकीचेच; पण नियमांच्या नावाखाली प्रत्येक परिस्थितीकडे एकाच मापाने पाहणेही तितकेच धोकादायक ठरू शकते.

**आज महाराष्ट्राला कडक अधिकारी हवेत. पण त्याचबरोबर कडक निर्णयामागे योग्य विवेक असलेले अधिकारीही हवेत.**

मुंढे यांची खरी कसोटी ही केवळ किती धाडी टाकल्या, किती आस्थापना सील केल्या किंवा किती कारवाया केल्या यात नाही. खरी कसोटी ही आहे की, या कारवायांमुळे नियमांचे राज्य मजबूत झाले का? सामान्य नागरिकाचा विश्वास वाढला का? आणि प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार व कार्यक्षम झाले का?

**लोकप्रतिनिधी आणि नोकरशाही यांच्यात संघर्ष असणे ही लोकशाहीची खूण नाही; तर दोघांनी आपल्या घटनात्मक मर्यादा ओळखून काम करणे ही खरी लोकशाही आहे.**

**तुकाराम मुंढे हे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या प्रशासनात निश्चितच वेगळे आहे. त्यांच्याबद्दल मतमतांतरे असू शकतात. कोणी त्यांना 'निर्भीड अधिकारी' म्हणेल, तर कोणी 'अति-कठोर प्रशासक' म्हणेल. पण एका अधिकाऱ्याची प्रतिमा कितीही मोठी असली तरी ती कायद्यापेक्षा मोठी असू शकत नाही.**

**आणि म्हणूनच आज प्रश्न मुंढे विरुद्ध सरकार असा नाही. प्रश्न आहे—**

**महाराष्ट्राला नियमांचा बुलडोझर हवा आहे की नियमांसोबत विवेकाची दिशा दाखवणारे प्रशासन?**

**कारवाई झाली पाहिजे. भ्रष्टाचाराला लगाम बसला पाहिजे. नियमभंग करणाऱ्यांना धडा मिळालाच पाहिजे. पण त्याचवेळी प्रशासनाने हेही लक्षात ठेवले पाहिजे—कायद्याची ताकद जनतेला दडपण्यासाठी नसते; जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी असते.**

मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्राची अपेक्षा म्हणूनच मोठी आहे. कारण कडक अधिकारी असणे ही केवळ प्रसिद्धीची बाब नाही; कठोरतेला न्याय, विवेक आणि संवेदनशीलतेची जोड देणे हीच खरी प्रशासकीय कसोटी आहे.

लोकांचा आवाज... सत्याची साथ...

साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज

बातमी विश्वासाची... विकासाची !

जनहितासाठी... सदैव तत्पर !

Volume-5 | Issue: 28 | Date: Friday 28/08/2026 To Thursday 03/09/2026 | Pages-No 3 | Prize-5 Rs | RNI.NO.MAHMAR/2022/85385

# ॲड. सुरेश दत्तात्रय व्हटकर यांचा
## सेवानिवृत्ती नंतरही समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास

### शिक्षण, समाजकार्य आणि आता वकीली क्षेत्रात नवी इनिंग

**मुळ कसबा सांगयाचे सुपुत्र रत्नागिरींचे कार्यतत्पर व्यक्तिमत्व**

**प्रतिनिधी : लोकहिरा न्यूज**

**रत्नागिरी :** मुळ कसबा सांगयाचे सुपुत्र श्री सुरेश दत्तात्रय व्हटकर हे दि. 23/11/1992 रोजी रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी, रत्नागिरी या नामांकित शक्षणिक संस्थेच्या कॉलेजमध्ये कनिष्ठ लिपीक म्हणून रूजू झाले. 13 जाने. 1996 रोजी त्यांच संस्थेच्या सौ. गोदूताई जांभेकर विद्यालय, रत्नागिरी येथे वरिष्ठ लिपीक म्हणून पदोन्नतीने बदली झाली. तब्बल 29 वर्षे त्यांनी एकमेव वरिष्ठ लिपीक म्हणून कर्तव्यनिष्ठपणे सेवा केली. शासनाच्या नवीन धोरणानुसार पद अतिरिक्त ठरल्याने संस्थेने त्यांना अन्य संस्थेत न पाठविता रा. भा. शिर्के हायस्कूल, रत्नागिरी येथे दि. 26 नोव्हेंबर 2024 रोजी बदली केली आणि नियत वयोमानानुसार ते 31 मे 2026 रोजी सेवानिवृत्त झाले.



### समाजहितासाठी अखंड योगदान

- कमी शिकलेल्या व वंचित मुलांना शिक्षणात आणले
- अनिरूद्ध बापू ट्रस्टमार्फत 70 गरजू विद्यार्थ्यांना माध्यमान्ह भोजनाची सुविधा
- दरवर्षी 350 वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप
- शाळेला विविध देणग्या मिळवून देत विकासकामे
- नेत्रदान, रक्तदान शिबिरे व स्वतः 4 वेळा रक्तदान

### वकिली क्षेत्रात नवी सुरुवात

सेवानिवृत्तीनंतर दि. 20/06/2026 रोजी त्यांना वकीली सनद व ओळखपत्र मिळाले. दि. 22/06/2026 पासून रत्नागिरी जिल्हा कोर्टात वकील म्हणून त्यांनी कामकाज सुरू केले आहे. दिवाणी, फौजदारी, शैक्षणिक न्यायालय, कामगार कल्याण न्यायालय आदी कामात त्यांना विशेष रस आहे.

# अझोला उत्पादन प्रात्यक्षिकाला
## साखळोलीत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### गोठ्याजवळ उपलब्ध होणार कमी खर्चात ताजा व पौष्टिक चारा

**प्रतिनिधी : सागर गोवळे**

**शिवाजी नगर, साखळोली :** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत ग्रामीण कृषी कार्य अनुभव कार्यक्रमांतर्गत 'संजीवनी' विद्यार्थिनींच्या गटाने साखळोली येथे अझोला उत्पादनाचे प्रात्यक्षिक यशस्वी रीत्या आयोजन केले. या उपक्रमाला स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




### अझोलाचे मुख्य फायदे

- प्रथिने, खनिजे, जीवनसत्वांनी समृद्ध
- पशुखाद्याचा खर्च कमी
- उत्कृष्ट जैवखत म्हणूनही वापर
- पाणी व्यवस्थापन व कापणीचे मार्गदर्शन

या प्रात्यक्षिकासाठी १३ ग्रामस्थ उपस्थित होते. 'संजीवनी' गटातील विद्यार्थिनींनी कृतिका ठाकरे, श्रावणी मिन्हुखणेकर, कुंजना कांबळे, कृतिका खोडका, वैष्णवी अहिरे, अंजली देवकाते व इतरांनी हा उपक्रम राबविला.

# कर्तव्यनिष्ठ होमगार्ड आण्णासो आनापुरे यांचा सेवापूर्ती गौरव

### ३५ वर्षांची निष्ठापूर्ण सेवेसाठी सन्मान

**गडहिंग्लज दि. २७**
**(प्रतिनिधी : संपत सावंत)**

गडहिंग्लज पोलीस ठाण्यात होमगार्ड म्हणून तब्बल ३५ वर्ष निष्ठेने सेवा बजावणारे असि. लीडर होमगार्ड आण्णासो दुंडाप्पा खानापूरे यांचा सेवानिवृत्त झाल्याबदल वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश होडगर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षल डॉ. रमेश पाटील होते. यावेळी पोलीस अधिकारी, सहकारी व मान्यवर उपस्थित होते.

साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
''लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ''
■ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७) ■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com
Volume-5/Issue: 28/ Date: Friday 28/08/2026 To Thursday03/09/2026 Pages-No 4

## कक्केरी मठात कक्कय्या स्वामी मूर्ती प्रतिष्ठापनेपूर्वी विशेष पूजा.



अध्यक्ष विठ्ठल पोळ, संचालक एस. एफ. नारायणकर, प्रमोद हुटगीकर, मूर्ती निर्माण समितीचे प्रमुख दिलीप घोडके, महापोषक सदस्य लक्ष्मण गजकोश, मंजुनाथ गजकोश, मठाचे पुजारी रामय्या होंनियाल, याल्लाप्पा शेरखाने आदी मान्यवर

कक्केरी : (लोकहिरा न्यूज वृत्तसेवा) शरण ढोर कक्कय्या स्वामी मठ, अखिल भारतीय ढोर कक्कय्या समाज मंडळ, कक्केरी यांच्या वतीने श्री कक्कय्या स्वामींच्या नवीन मूर्ती प्रतिष्ठापनेपूर्वी विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. उप्पिन बेटगेरी मठाच्या श्रीगुरूंच्या मार्गदर्शनानुसार गोकाकचे श्री विजय हिरेमठ स्वामीजी यांनी २६ ऑगस्ट रोजी श्री क्षेत्र कक्केरी मठाला भेट देऊन गर्भगृहाची पाहणी केली.

नवीन श्री कक्कय्या स्वामी मूर्तीच्या स्थापनेपूर्वी मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ ते ११ वाजेपर्यंत कर्तृ सिंहासन जीर्णोद्धारासाठी गणपती पूजा, रुद्राभिषेक (काला संकोचा पूजा) आदी धार्मिक विधी भक्तीभावाने पार पडणार आहेत. या पूजाविधीस ढोर कक्कय्या समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री कक्कय्या स्वामींचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी ABDKS मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल पोळ, संचालक एस. एफ. नारायणकर, प्रमोद हुटगीकर, मूर्ती निर्माण समितीचे प्रमुख दिलीप घोडके, महापोषक सदस्य लक्ष्मण गजकोश, मंजुनाथ गजकोश, मठाचे पुजारी रामय्या होंनियाल, याल्लाप्पा शेरखाने आदी उपस्थित होते. भक्ती, सेवा आणि भावनेतून या धार्मिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गरिबीवर मात करत सुप्रियाची भरारी; एकाच वेळी दोन शासकीय पदांवर निवड.



गडहिंग्लज, लोकहिरा न्यूज प्रतिनिधी (संपत सावंत)

प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि मर्यादित साधनांवर मात करत औरनाळ (ता. गडहिंग्लज) येथील कु. सुप्रिया वीरभद्र खानापुरे हिने स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. तिची नाशिक महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी निवड झाली आहे. शेतकरी व मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबातून आलेल्या सुप्रियाने जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळविले. अभियांत्रिकी शिक्षणासोबतच तिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. तिचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या बळावर यश मिळवता येते, हे तिने सिद्ध केले आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
"लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ"
लोकहिरा न्यूज

■ संपादक: श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७)
■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com

## नवोदित गायकांना सुवर्णसंधी...

# राज्यस्तरीय करांओके गाण्याच्या स्पर्धा...

गाणं तुमचं मंच आमचा...!

तुमच्या आवाजाला मिळवा मोठा मंच...!

साप्ताहिक लोकहिरा न्यूज च्या **चौथ्या** वर्धापनदिनानिमित्त विशेष आयोजन

## स्पर्धेचे नियम व अटी

1. या स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे दोन गट असतील..
   (अ) प्रथम गट (महिला, पुरुष) .. 12 ते 45 वर्षे
   (ब) दुसरा गट (महिला, पुरुष) .. 46 वर्षेपुढील सर्व पुरुष महिला
2. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपले नाव, पत्ता, संपर्कक्रमांक, आपण वरील दोन गटापैकी कोणत्या गटात सहभागी होणार? यासाठी जन्मदिनांकाचा पुरावा, प्रवेश फी व सादर करू इच्छित असलेल्या दोन मराठी व दोन हिंदी गीतांची नावे कळवावीत.
3. प्रत्येक फेरीसाठी आपण दिलेल्या चार गाण्यांपैकीच (ऐनवेळी परीक्षक सांगतील ते गाणे व त्यांचे सूचनेनुसार) सादर करणे आवश्यक आहे.
4. या स्पर्धा कराओके ट्रॅकवर होत असल्याने प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी आपण सादर करणाऱ्या गाण्यांचे ट्रॅक स्वतःच्या मोबाईल किंवा पेनड्राईव्ह वरून डाउनलोड करून आपल्या जबाबदारीवर आणावेत.
5. सध्याच्या नियोजनानुसार स्पर्धेच्या गाण्यांच्या तीन फेऱ्या पूर्ण करून अंतिम निकाल गोपनीय ठेवला जाईल. या स्पर्धा "साप्ताहिक लोकहिरा न्यूज" च्या चौथ्या वर्धापनदिना निमित्त आयोजित केलेल्यामुळे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते वर्धापनदिनांचे मुख्य मोठ्या कार्यक्रमात केले जाणार आहे. मोठ्या कार्यक्रमात स्पर्धेतील काही सहभागी गायकांना गाणी सादर करण्याची संधी दिली जाणार आहे.
6. वरील नियोजनात काही बदल झाल्यास, संबंधितांना लगेचच त्या त्या वेळी कळविपोल येईल.
7. स्पर्धा पारदर्शक होण्यासाठी परीक्षकांचा निर्णय अंतिम असून संयोजन कमिटी, परीक्षक यांचेकडे त्यावावत कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
8. स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धकांनी स्वतःच्या खर्चाने स्पर्धा स्थळी येणेचे आहे.
9. वरील (नियम क्र.2) मधील सर्व माहिती व प्रवेश फी रूपये **500/-** खालील समन्वयांकडे (ऑनलाईन/रोख स्वरूपात) संपर्क करून पाठवावी.
10. अ) सहभागी होण्यासाठी प्रवेश नोंदवण्याची शेवटची तारीख 20 सप्टेंबर 2026 संध्याकाळी 6 वाजेपर्यंत
    ब) स्पर्धेचा दिनांक : रविवार, 27 सप्टेंबर 2026
    क) स्पर्धेचे ठिकाण : शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर (नामांकित स्टुडिओ येथे)

## बक्षिसे खालिल प्रमाणे

प्रत्येक गटाकरिता

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक : | 3333/- रु आकर्षक शील्ड व मानाचा फेटा |
| द्वितीय क्रमांक : | 2222/- रु आकर्षक शील्ड व मानाचा फेटा |
| तृतीय क्रमांक : | 1111/- रु आकर्षक शील्ड व मानाचा फेटा |

तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना आकर्षक त्यांच्या फोटो सहित प्रमाणपत्र

## महत्वाच्या तारखा व माहिती

प्रवेश नोंदवण्याची शेवटची तारीख :
**20 सप्टेंबर 2026**
संध्याकाळी 6 वाजेपर्यंत

स्पर्धेचा दिनांक :
**रविवार, 27 सप्टेंबर 2026**

स्पर्धेचे ठिकाण :
**शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर (नामांकित स्टुडिओ येथे)**

विशेष सहकार्य : संविधान विचार मंच पदाधिकारी

समन्वयक
गणपती शिंदे
7276756577

स्वप्नांना द्या सूर...
तुमचा आवाज, आमचा विश्वास...!

आजच नोंदणी करा..!